## निशाणी क्र. २५ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे अर्ज निशाणी क्र. ५ मध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

०२. अर्ज व प्रतिवादींनी अर्जास दिलेले म्हणणे वाचले. वादीतर्फे वकील श्रीमती शुभदा मोकल व प्रतिवादी तर्फे वकील श्री. सुयोग पोतदार यांचा युक्तिवाद ऐकला.

०३. वादीचा युक्तीवाद की, निशाणी क्र. ०५ अन्वये प्रतिवादी क्र. १ यांनी दावामिळकतीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये व तिऱ्हाईत इसमाचे हक्क प्रस्थापित करु नये अशी तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी केली. परंतु, टंकलेखित चुकीमुळे तुर्तातुर्त या शब्दाऐवजी निरंतर ताकीद हा शब्द लिहिण्यात आला. तसेच, अनावधानाने बॅलन्स ऑफ कन्व्हेनियन्स, इररिपेरेबल लॉस व प्रायमाफेसी केस वादीच्या बाजुने आहे ही बाब लिहिणे राहुन गेले. सबब, अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे क्रमप्राप्त झाले. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दावा, निशाणी क्र. ५ च्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब, नैसर्गिक न्यायतत्वान्वये अर्ज मंजुर व्हावा अशी विनंती केली.

०४. प्रतिवादी क्र. १ ने प्रस्तावित दुरुस्तीस सक्त हरकत असल्याचे कथन केले.

०५. उभयपक्षातर्फे करण्यात आलेल्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. वादीचे कथन लक्षात घेता प्रस्तावित दुरुस्तीने वादी हे केवळ टंकलिखित चुक दुरुस्त करु पाहत आहे व अनावधानाने न लिहिण्यात

आलेला मजकुर लिहु पाहत आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही निश्चितच किरकोळ स्वरुपाची आहे. प्रस्तावित दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादी क्र. १ चे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट उद्भवणारी गुंतागुंती टळणार आहे. एकुणच वादीने दाव्यात प्रस्तावित दुरुस्तीची केलेली प्रार्थना ही प्रामाणिक असल्याचे दिसुन येते. सदर चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज न्याय हितास्तव मंजूर होण्यास पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदविण्यात येतो. परिणामी, खालील आदेश.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस मागणीप्रमाणे अर्ज निशाणी क्र. ५ मध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. आदेश कलम २ ची वादीने पुढील तारखेपर्यंत पुर्तता करावी.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

PRAVIN MOHAN UNHALE
Digitally signed by PRAVIN MOHAN UNHALE
Date: 2025.01.04 16:43:14 +0530

महाड,
दिनांक ०४/०१/२०२५

(**पी. एम. उन्हाळे**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड